नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:२४/०४/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.५

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.३०/०४/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे** भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

घनकचरा व्यवस्थापन आढावा

विषय क्र.१११

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी १५ क्षेत्रीय कार्यालयाकडील दि.०१/०३/२०२६ ते दि.२८/०३/२०२६ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/३४, दि.२२/०४/२०२६ चे पत्र.

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र.११२

दिनांक २३/०३/२०२६ ते २९/०३/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ११६ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/२९, दि.२२/०४/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

विषय क्र.११३

दिनांक १६/०३/२०२६ ते २२/०३/२०२६ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण ८७ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/३०, दि.२२/०४/२०२६ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

मागील सभेचे विषय

विषय क्र.११४

पुणे पेठ सोमवार राजश्री शाहू महाराज उद्यान येथील वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरिता चालविणेस देणेबाबत निविदा मागविली असता आलेल्या ४ निविदांपैकी निविदाधारक मे. पी.बी.पी. ग्रुप, पुणे यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रुपये

१,०४,०२५/- ही मनपा निर्धारित रक्कम रुपये ५४,७५०/- पेक्षा रक्कम रुपये ४९,२७५/- म्हणजेच ९०% ने जास्त असल्याने सदर निविदा स्वीकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीनुसार प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर २% आयकर घेणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२००९, दि.१८/०३/२०२६ चे पत्र.

(टीप - सदर विषयाचा विचार एक (१) महिन्यानंतर करण्यात यावा असे दिनांक २७/०३/२०२६ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र.११५

पुणे पेठ बुधवार येथील महात्मा फुले मंडई परिसरातील आर्यन वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरिता चालविणे करिता निविदा मागविल्या असता आलेल्या ५ निविदांपैकी सर्वाधिक दर देणारे निविदादार मे. इंडिया एन्टरप्रयाझेस, यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रुपये ६२,०७,७८३=७७८ ही मनपा निर्धारित रक्कम रुपये ४२,४३,८५५/- पेक्षा र.रु. १९,६३,९२८=७७८ पेक्षा (४६.२२७ % ने जास्त) असल्याने त्यांची निविदा स्वीकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी टेंडर अटी व शर्ती प्रमाणे प्रती वर्षी २ % आयकर घेणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्यसभेची मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/१८, दि. १५/०४/२०२६ चे पत्र.

(टीप - सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा असे दि.२३/०४/२०२६ च्या सभेत ठरले होते.)

<u>संकीर्ण</u>

विषय क्र.११६

संत तुकाराम माध्यमिक विद्यालय, पाषाण येथे इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मराठी माध्यम विज्ञान, वाणिज्य आणि कला कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/इओ/२०१८, दि. १८/०३/२०२६ चे पत्रावर झालेला मा. शिक्षण समिती ठराव क्र.२ दि.१०/०४/२०२६ विचारासाठी.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका